# जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

**काटा रोड, वाशिम-४४४५०५**

दूरध्वनी ०७२५२-२३२८५२ फॅक्स ०७२५२-२३२८५८

ईमेल :dycrevenue.washim@mail.com वेबसाईट http://washim.nic.in

जिल्हातील सर्व तालुक्यामध्ये संपुर्ण कृषि गणना २०१५-२०१६ करीता गावनिहाय प्रपत्राचे प्रती पान प्रिंट करण्याकरीता एका वर्षाच्या कालावधीसाठी नोंदणीकृत पुरवठादार व्यक्ती, संस्था इ. कडून विहीत नमुन्यात सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

इच्छुक नोंदणीकृत पुरवठादार व्यक्ती, संस्था पुरवठादार यांनी दि. २२.८.२०१७ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सिलबंद पाकीटात दरपत्रके सादर करावीत. त्यानंतर प्राप्त दरपत्रकाचा विचार केल्या जाणार नाही. तसेच प्राप्त दरपत्रके दि. २२.८.२०१७ ला ५.०० वाजता मा. अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या समक्ष उघडण्यात येतील. अटी व शर्ती खालील प्रमाणे विहीत करण्यात आल्या आहेत.

## अटी व शर्ती:-

१. जिल्हयातील एकुण गावनिहाय प्रपत्राचे पानांची संख्या जवळपास ६०००० राहिल.

प्रिंट काढण्याच्या प्रतीचे संख्येत कमी जास्त बदल संभव आहे.

२. पुरवठा दारास कोणत्याही प्रकारचा आगावू अग्रीम दिल्या जाणार नाही.

३. गाव निहाय काढण्यात येणाऱ्या प्रिंटची गुणवत्ता उच्च गुणवत्ता व चांगल्या प्रतिची असणे आवश्यक आहे.

४. दरकरार झालेल्या कालावधीत वस्तुंच्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करता येणार नाही तसेच पुरवठादाराकडून सादर करण्यात येणाऱ्या देयकांमध्ये कोणत्याही प्रकारचे कर लावता येणार नाही.

५. कोणत्याही बाबतीत विवाद उद्‌भवल्यास मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहिल.

६. सदर दरकरार मंजुरीचा कालावधी हा दरकरार मंजुरी ओदशाच्या दिनांकापासून एका वर्षाचा असेल.

७. पुरवठादार यांना जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयाशी समन्वय साधुन कार्यालयाकडून प्राप्त सॉफ्ट कॉपीचे प्रिंट काढणे अपेक्षित आहे.

८. पुरवठादार यांना एकत्रित मानधन कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडून निधी प्राप्त होताच वितरीत करण्यात येईल.

जिल्हाधिकारी, वाशिम करीता